# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०५/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## पो.स्टे. कन्हान हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई :—

दिनांक २७/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोस्टे कन्हान हद्दीत मच्छी मार्केट मध्ये जयस्वाल भट्टीचे मागे मोनु यादव हा आपले बंद पडलेल्या साई लॉट्री दुकानासमोर सार्वजनिक रोडवर काही इसम लोकांकडुन पैसे घेवुन कागदावर वर्ली मटक्याचे आकडे लिहुन तसेच ताशपत्त्यावर पैसे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून पोस्टे कन्हान हद्दीत स्वामी विवेकानंद नगर कन्हान मच्छी मार्केट मध्ये जयस्वाल भट्टीचे जवळ पोहचुन साई लॉट्री दुकानासमोर सार्वजनिक रोडवर जुगार अड्डयावर रेड केली असता यातील **आरोपी नामे—१) रोहीत उर्फ मोनु रामुजी यादव रा. गवलीपुरा कन्हान २) सुमीत भिमराव कोटांगळे रा. नवीन गोदाम कामठी ३) अमोल देवमंन तिमांडे रा. स्वामी विवेकानंद नगर कन्हान ४) विवेक शांताराम खडसे रा. विवेकानंद नगर कन्हान ५) महेश गंगाधर ठवकर रा. दुर्गा मंदीर मोंढा मोहल्ला कामठी** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन ०६ वेगवेगळया कंपनीचे अॅन्ड्राईड व किपॅड मोबाईल फोन किंमत १,३४,०००/—रू. २) एक कॅल्क्युलेटर व ५२ तासपत्ते किंमत १०५/— रू. ३) ०७ वेगवेगळया कंपनीचा मोटारसायकल किंमती ४,४०,०००/— रू. ४) नगदी १४,४००/— रू. असा एकुण जप्त माल किंमती ५,८८,५०५/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम १२, १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. किशोर शेरकी, पोहवा ललीत उईके, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर